14 JUN 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनाच्या बळावर चंदगडची जागतिक भरारी

## जगातील अव्वल ५ टक्के शास्त्रज्ञांमध्ये तालुक्यातील दोन संशोधक

**जनप्रवास : हलकर्णी**

चंदगड तालुक्यातील दुंडगे येथील डॉ. नीलेश लक्ष्मण तरवाळ आणि कालकुंद्री येथील प्रा. डॉ. विठोबा लक्ष्मण पाटील यांची प्रतिष्ठित 'SciRank Global Registry 2025' मध्ये जगातील अव्वल पाच टक्के शास्त्रज्ञांमध्ये नोंद झाली. या ऐतिहासिक कामगिरीमुळे चंदगड तालुक्याच्या शैक्षणिक आणि बौद्धिक परंपरेचा डंका आता जागतिक संशोधन क्षेत्रातही घुमू लागला आहे.

जगभरातील लाखो संशोधकांच्या संशोधन कार्याचे मूल्यमापन करून हे मानांकन दिले जाते. दुंडगेचे सुपुत्र डॉ. नीलेश तरवाळ हे सध्या शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. भौतिकशास्त्र विषयातील त्यांचे दर्जेदार संशोधन, आंतरराष्ट्रीय स्तरावरील शोधनिबंध आणि विद्यार्थ्यांना दिलेले संशोधनात्मक मार्गदर्शन यामुळे त्यांनी राष्ट्रीय आणि जागतिक शैक्षणिक




नीलेश तरवाळ विठोबा पाटील

क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

तर कालकुंद्रीचे प्रा. डॉ. विठोबा लक्ष्मण पाटील हे चंदगड येथील र भा माडखोलकर महाविद्यालयात तसेच कोवाड येथील कला महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. अध्यापनासोबतच संशोधन क्षेत्रात त्यांनी सातत्याने केलेल्या नावीन्यपूर्ण आणि गुणवत्तापूर्ण कामाची दखल थेट जागतिक स्तरावर घेतली आहे. ग्रामीण पार्श्वभूमीतून येऊन जागतिक संशोधन क्षेत्रात ठसा उमटविण्याची त्यांची कामगिरी अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

**● दुंडगेचे डॉ. नीलेश तरवाळ आणि कालकुंद्रीचे प्रा. डॉ. विठोबा पाटील यांना 'SciRank Global Registry 2025'चा बहुमान**

या दोन्ही संशोधकांच्या यशामुळे चंदगड तालुक्याच्या शैक्षणिक क्षमतेला जागतिक मान्यता मिळाली असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी संशोधन क्षेत्रात करिअर घडविण्याचा नवा आदर्श निर्माण झाला आहे. ज्ञान, परिश्रम आणि चिकाटी यांच्या बळावर जागतिक स्तरावर पोहोचता येते, याचा संदेश या यशातून अधोरेखित झाला आहे. डॉ. नीलेश तरवाळ आणि प्रा. डॉ. विठोबा पाटील यांच्या या अभूतपूर्व कामगिरीचे चंदगड तालुक्यासह संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यातून कौतुक होत आहे. त्यांच्या यशामुळे चंदगडच्या शैक्षणिक इतिहासात सुवर्णपानाची भर पडली असून, तालुक्याचे नाव जागतिक विज्ञानविश्वात

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2026
पुढारी

# दूरशिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रम प्रवेशास १० जुलैपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीच्या विविध पदवी, पदव्युत्तर व ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस १० जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली. बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या दूरशिक्षण अभ्यासक्रमांसह ऑनलाईन एम.बी.ए., एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू आहेत. विद्यार्थ्यांना ८९ अभ्यास केंद्रांमार्फत प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे.